म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. 9249



## कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401251
BVBK-0401251

# बहादूर शिकारी

# बहाद्दर शिकारी

कांहीं तरी नवेंच करा : १९

•

गोविंद केशव जोगळेकर

...वाचनालय शाखा.
१२५९ दि. २०।५।६७
बा-वा

BVBK-0401251
BVBK-0401251

पन्नास नये ...
वोरा अ‍ॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.

श्री : १७०

::

© १९५९
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

::

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स, प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

::

आवृत्ति दुसरी
१९६२

::

मूल्य ५० नये पैसे

::

मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी,
मुंबई ५९.



शिकारी म्हणजे नुसता हडेलहप्प गडी अशी आपली समजूत असते. परंतु जिम् कॉर्बेटचें हें चरित्र वाचलें म्हणजे ती समजूत किती चुकीची आहे हें लक्षांत येईल. निसर्गाविषयींचें कॉर्बेटचें सूक्ष्म ज्ञान, निसर्गावरचें त्याचें गाढ प्रेम आणि शिकारीकडे केवळ एक खेळ म्हणून न पहातां संकटग्रस्तांच्या संकट-निवारणासाठीं करावयाचें एक श्रेष्ठ कर्तव्य म्हणून पहाण्याची त्याची वृत्ति, हें सारेंच त्याच्याबद्दलचा आदर शत-गुणित करणारें आहे. एक आदर्श शिकारी म्हणून जग त्याच्याकडे बोट दाखवितें, तें योग्यच आहे.

# बहादूर शिकारी-जिम् कॉर्बेट

नैनीतालपासून पंधरा मैलांवर असलेल्या कालादुंगी नांवाच्या खेड्यांतील ही एक गोष्ट आहे.

या खेड्याभोंवतीं घनदाट जंगल पसरलेलें होतें. त्या घनदाट जंगलांतून नेहमीं वाघांच्या डरकाळ्या ऐकूं येत असत. त्यामुळें आपलें घर सोडून एकट्या दुकट्यानें बाहेर पडण्याची कोणाहि गांवकऱ्याची हिंमत होत नसे. एक तरुण मात्र याला अपवाद होता. त्याचें नांव टॉम-टॉम कॉर्बेट.

टॉम कॉर्बेट सुदृढ होता, साहसी होता, बेडर होता. शिकारीचा त्याला विलक्षण छंद होता. पट्टीचा नेमबाज होता तो. नेमबाजींत त्यानें सुवर्णपदकच मिळविलेलें होतें. गांवकऱ्यांचा टॉमवर मोठा विश्वास. 'टॉम एका गोळींत दोन रानडुकरांना गारद करील' असें गांवकरी म्हणत ! टॉम खरोखरच तसा बंदूकबहाद्दर होता.

**पहिला जंगल-संचार :**

असाच एकदां टॉम बंदूक खांद्यावर टाकून शिकारीला निघण्याच्या तयारींत होता, तोंच कोणीतरी त्याला म्हटलें, "टॉम, मी सुद्धां आज तुझ्याबरोबर जंगलांत येणार."

टॉमनें चमकून वळून पाहिलें तों त्याचा लहान भाऊ जिम् तिथें उभा होता. छोटा जिम् अवघा आठ वर्षांचा होता. त्याचा चेहरा तरतरीत होता. त्याच्या चेहऱ्यावर उत्साह नुसता ओसंडत होता. आपल्या छोटया भावाबद्दल टॉमला फार कौतुक वाटे. जिम् म्हणजे टॉमचा जीव कीं प्राण. टॉम जिम्‌ला फार जपत असे. म्हणूनच जिम्‌चा हा विचित्र हट्ट ऐकून टॉमला आश्चर्याचा धक्काच बसला.

"काय म्हणालास ? तूं–तूं जंगलांत येणार ?" टॉम आश्चर्यानें उद्‌गारला.

"अं. होय–मला शिकारीची गंमत पाह्यची आहे. तुझ्यासारखी शिकार करायची आहे. ए, टॉम, मला शिकव ना रे बंदूक उडवायला," जिम् आर्जवानें म्हणाला.

"पण जिम् तूं अजून लहान आहेस," टॉमनें जिम्‌ची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु छोटया जिम्‌नें आपला हट्ट मुळींच सोडला नाहीं.

छोटया जिम्‌चा आरडओरडा ऐकून स्वयंपाकघरांतून त्यांची आई घाबऱ्या घाबऱ्या बाहेर आली. बिचारीचें जिम्‌वर भारी प्रेम होतें. जिम्‌ला ती फुलासारखी जपत असे. जिम् कुठें भाजला, पोळला कीं पडला अशीच तिला शंका आली. पण बाहेर येतांच, जिम्‌नें सर्व सोडून जंगलांत जाण्याचा हट्ट धरलेला आहे असें जेव्हां तिला समजलें

तेव्हां तर बिचारीच्या काळजाचें पाणी झालें ! तिनें जिम्‌ला घट्ट धरून ठेवलें.

"माझी तुला शपथ आहे एकटा दुकटा जंगलांत गेलास तर," ती म्हणाली.

"पण आई, मी एकटा नाहीं, माझ्याबरोबर टॉम-सुद्धां आहे कीं !–" जिम्‌नें खुलासा केला.

"ओ हो, तूं टॉमबरोबर जंगलांत चालला आहेस होय ? मग–मग हरकत नाहीं–"

आईला जिम्‌बद्दल जशी काळजी होती त्याप्रमाणेंच टॉमबद्दलहि तिची पुरेपूर खात्री होती. "टॉम बरोबर असल्यावर तूं जंगलांत नव्हे महाजंगलांत गेलास तरी माझी हरकत नाहीं," ती म्हणाली.

आईची तर परवानगी मिळाली, पण टॉम ? तो तयार झाला पाहिजे ना ? त्याला आपल्याबरोबर न्यायला. त्यावरहि जिम्‌नें तोड काढली. "ए टॉम, तुझ्याप्रमाणेंच मी सुद्धां शूर व्हावं असं तुला नाहीं वाटत ?" जिम्‌नें खुबीनें प्रश्न केला.

"कां म्हणून नाहीं ? उलट तूं तर माझ्याहिपेक्षां शूर व्हावंस असं मला वाटतं. चल धर माझं बोट....." टॉम म्हणाला.

जिम्‌ची मात्रा बरोबर लागू पडली.

मोठ्या भावाचें बोट धरून जिम् मोठ्या खुषींत जंगलाकडे निघाला.

जिम् कॉर्बेटचा जंगलसंचार अशा रीतीनें वयाच्या अवघ्या आठव्या वर्षापासूनच सुरू झाला. टॉमनें त्याला एक गलोल दिली. ती गलोल घेऊन जिम् अगदीं एकटाच्या एकटा जंगलांत जात असे. अगदींच एकटा असें म्हणतां येणार नाहीं. कारण बरोबर तो आपल्या कुत्र्याला सुद्धां नेत असे. जिम्चा हा 'दोस्त' हि चांगलाच हुशार होता. हातांत गलोल घेऊन, आपल्या या दोस्ताबरोबर जिम् जंगलांत स्वैरपणें भटकत असे.

## 'अंकल' कॉर्बेट :

जिम्चें कौतुक करणारी आणखी एक व्यक्ति होती. ती म्हणजे जिम्चे काका. जिम् त्यांना 'अंकल' म्हणत असे.

हे 'अंकल' कॉर्बेट एक अजब व्यक्ति होती. आपल्या खोलीचें दार बंद करून अन् हातांत लेखणी घेऊन जिम्चे काका तासन् तास कांहींतरी लिहीत असत. त्यांच्या मेजावर कागदांचा ढीगच्या ढीग पडलेला असे. कधीं कधीं काकांची स्वारी कसलींतरी चित्रेंहि रेखाटत बसलेली असे. लेखनाच्या आणि चित्रें काढण्याच्या कामांत काका इतके गर्क होऊन जात कीं, त्यांना खाण्यापिण्याची देखील शुद्ध रहात नसे.

छोट्या जिम्ला काकांच्या या उद्योगाबद्दल फार नवल वाटे. काका इतकें काय लिहीत असतात ? अन् काय

चितारीत असतात ? असे प्रश्न जिम् आपल्या मनाला विचारीत असे. एके दिवशीं सरळच त्यानें मग आपल्या काकांना प्रश्न केला.

"अंकल, तुम्ही सदान् कदा कागदावर काय लिहीत असतां हो ?" जिम्नें विचारलें.

"बरं का जिम्, मी एक पुस्तक लिहितों आहें," अंकल म्हणाले. 'कुमावमधील पक्षी' या नांवाचें खरोखरीच ते एक पुस्तक लिहीत होते. जिम्ला त्यांनीं त्या ग्रंथाबद्दल थोडक्यांत माहिती दिली. आपले काका पक्ष्यांसंबंधीं पुस्तक लिहीत आहेत हें ऐकून जिम्ला आनंदच झाला. तो काकांना म्हणाला, "काका, तुमच्या या कामांत मी सुद्धां तुम्हांला मदत करीन."

"तूं रे मला कसली मदत करणार ?"

"कां ? काका, मी तुम्हांला जंगलांतून पक्षी आणून देईन; त्या पक्ष्यांचीं तुम्ही सुंदर चित्रं रंगवा."

पक्ष्यांचीं चित्रें काढण्याची कल्पना काकांनाहि पसंत पडली. "तुझी कल्पना चांगली आहे जिम्. तुला सांपडतील तितके पक्षी दे मला आणून; मी त्यांचीं सुंदर चित्रं काढीन," काका म्हणाले.

काकांनीं उत्तेजन दिल्यामुळें जिम्ला मोठाच हुरूप आला. पक्षी पकडण्याचा त्यानें जसा सपाटाच सुरू केला. उन्हातान्हाची, कांटयाकुटयांची, तहानभुकेची

पर्वा न करतां जंगलांत स्वैरसंचार करून छोटया जिम् कॉर्बेटनें थोडयाच दिवसांत, थोडेथोडके नाहींत, तर चारशें ऐंशीं जातींचे पक्षी धरून आपल्या काकांना 'बक्षीस' दिले. बिचारे अंकल ! थक्कच झाले ते जिम्चा हा विलक्षण पराक्रम पाहून.

**वाघोबाचें पहिलें दर्शन :**

अशा तऱ्हेनें जिम् जंगलांत चांगलाच रमला. या जंगलसफरींतच जिम्ला सायाळ अन् एक भला मोठा अजगर यांचें दर्शन झालें.

एकेक नवे प्राणी जिमला आढळत होते. तरीसुद्धां जिम् मनांतून थोडा खट्टूच होता. कारण त्याचें हें सारें आयुष्य केवळ पक्ष्यांच्याच सहवासांत जात होतें. त्याला तर मनांतून वाघ पाहण्याची फार इच्छा झाली होती. जिम्ची इच्छा लौकरच पूर्ण झाली अन् ती देखील मोठचा नाटचमय प्रसंगानें !

असाच एकदां जिम् आपल्या दोस्तासह–म्हणजेच आपल्या लाडक्या कुत्र्यासह पांखरांच्या मागें धांवत असतांना कशाला तरी पाय अडखळून धडपडला. जिम्नें लगेच खालीं वांकून पाहिलें, तों काय ? खालीं पाल्या-पाचोळचावर वाघाचें एक प्रचंड धूड झोपीं गेल्याचें त्याला आढळून आलें. मधेंच झोपमोड झाल्यामुळें वाघानें

लगेच गुरगुरण्यास सुरुवात केली. जिम्च्या कुत्र्याकडे पाहून तर वाघोबा पंजे पसरून उभाच राहिला !

वाघोबाचा तो रुद्रावतार बघून छोटा जिम् आणि त्याचा कुत्रा भेदरून गेले. जिम् त्यावेळीं लहान पोरच होता. त्यामुळें त्या क्रूर वाघाला पाहतांच त्यानें लगेच घराकडे पळ काढला. पाठोपाठ त्याचा कुत्रासुद्धां धांपा टाकीत पळत आला.

आपल्या लहानपणीं घडलेल्या या प्रसंगाचें वर्णन कॉर्बेटनें मोठेपणीं लिहिलेल्या एका ग्रंथांत गमतीदार पद्धतीनें केलें आहे. त्यांत तो लिहितो, "यावेळीं मी कल्पना करूं शकलों नाहीं, पण आतां असें वाटतें कीं, आम्ही असे पळाल्यावर तो वाघ मोकळ्या जागीं दोन पायांवर बसला असेल. आणि केवळ झोपमोड झाल्यामुळें सहज 'शुक् ! कोण इथं धडपडतोय् रे ?' एवढेंच आपण म्हटलें आणि तेवढ्यानेंच एक पोर आणि एक कुत्रें कसें घाबरून पाय लावून पळालें, हें बघून वाघ मोठ्यानें हंसला असेल."

जिम्ला असा घाबऱ्या घाबऱ्या धांवत पळत आलेला पाहतांच त्याचे चुलते त्याला जवळ घेत म्हणाले, "अरे असा पळतोस कां जिम् ? तुझ्या पाठीमागें वाघ का लागलाय् ?"

"अं–काका मीं वाघाची झोपमोड केली म्हणून वाघ रागावलाय्" असें म्हणत जिम्‌नें जंगलांत घडलेला सारा प्रकार काकांना सांगितला.

तें ऐकून काका थक्कच झाले. मग त्याला ते समजावीत म्हणाले, "हें पहा जिम्, हातांत शस्त्र असल्याखेरीज अशा रीतीनं जंगलांत भटकणं धोक्याचं आहे. थांब, मी तुला एक बंदूक देतों."

जिम्‌नें शेंकडों पक्षी आणून दिल्यामुळें जिम्‌चे काका त्याच्यावर खूष होते. जिम्‌ला कांहीं तरी छानदार भेट द्यावी अशी किती तरी दिवस त्यांच्या मनांत इच्छा होती. ती पुरी करण्याची संधि आज अशी चालून आली होती.

अंकल कॉर्बेटनीं जिम्‌ला मग एक बंदूक बक्षीस दिली. जिम्‌ला अर्थातच फार आनंद झाला.

**शिकारीचा श्रीगणेशा:**

जिम्‌ला बक्षीस मिळालेली ती बंदूक जुन्या पद्धतीचीच होती. ठासणी पद्धतीनें तींत दारू भरीत. एके वेळीं जादा बार भरल्यामुळें या बंदुकीची उजवी नळी निकामी झालेली होती. या जुन्या बंदुकीची जिम्‌नें नीट तपासणी केली. आणि डाव्या नळीचा उपयोग करून आपणाला पुष्कळ शिकार साधतां येईल अशी जिम्‌ला आशा निर्माण झाली.

जिम् छोटा होता पण त्याचा निश्चय मोठा होता. बडा शिकारी होण्याचें ध्येय अगदीं लहानपणींच त्याच्या मनांत रुजलें होतें.-अर्थात् ध्येय जरी केवढेंहि मोठें असलें तरी त्यासाठीं परिश्रमहि तसेच मोठ्या प्रमाणांत घ्यावे लागतात. परिश्रम म्हणजे कष्ट, एकाग्रता, चिकाटी. कष्ट घेतल्याखेरीज कोणीहि यशस्वी होऊं शकत नाहीं. कष्ट घेतांना कंटाळा, आळस करून भागत नाहीं. छोट्या जिम्लाहि आळस, कंटाळा कसा तो माहीतच नव्हता. बंदूक हातांत पडतांच त्यानें लगेच नेमबाजीचा पद्धतशीर अभ्यास सुरू केला. आपल्या मोठ्या भावाला-टॉमलाच त्यानें आपला गुरु केला.

टॉमहि जिम्ला उत्तेजन देऊं लागला. खरें म्हणजे छोट्या जिम्ची नेमबाजी पाहून टॉम चकितच झाला होता. एके दिवशीं टॉम जिम्ला म्हणाला, "जिम्, माझी खात्री आहे तूं पुढें मोठा शिकारी होणार."

आपल्या जुन्या आणि अडगळींत पडलेल्या बंदुकीचा असा योग्य उपयोग झालेला पाहतांच अंकल कॉर्बेटनाहि फार आनंद वाटला. काकांनीं दिलेल्या त्या जुन्या बंदुकीच्या जोरावर जिम् दोन वर्षें शिकार करीत होता. रानकोंबड्या, लांडोऱ्या आणि निरनिराळे पक्षी मारून, कित्येक दिवसांचें अन्न त्यानें आपल्या कुटुंबाला पुरविलें ! जिम्चा शिकारीचा व्याप एवढ्यावरच थांबला नाहीं,

तर त्यांच्याकडे येणाऱ्या एका भल्या गृहस्थानें, मोठ्या मिनतवारीनें दिलेल्या बंदुकीच्या साह्यानें या बच्च्यानें एक बिबटा मारला. श्रेष्ठ शिकारी जिम् कॉर्बेटच्या आयुष्यांतली हीच पहिली मोठी शिकार.

असा शिकारीचा हा श्रीगणेशा झाला. आणि पुढचें सर्व आयुष्य जिम्नें केवळ शिकारीच्या नादांतच घालविलें.

जिम् आतां मोठा झाला. साहजिकच त्याचा शिकारींतला अनुभवहि वाढला. शिकारीचा नाद पुष्कळांना असतो. कदाचित कांहीं लोकांना या शास्त्रांतील माहितीहि असेल. पण या तंत्रांतील जिम् कॉर्बेटचें वागणें सारेंच जगावेगळें होतें !–अतिविलक्षण–चकित व्हावें इतकें निराळें. सुरुवातीस कोंबड्या, हरणें मारणाऱ्या जिम्चें लक्ष आतां सर्वस्वीं वाघाकडेच लागलें. त्याच्या बंदुकीचें वाघ हेंच प्रामुख्यानें सावज बनलें.

### कुमावमध्यें काय घडत होतें ?

त्या काळांत वाघांनीं कुमावमध्यें कमालीचा धुमाकूळ घातला होता. माणसाच्या रक्ताची या वाघांना फार चटक लागलेली होती. कुमावमधल्या शेंकडों माणसांचे या वाघांनीं बळी घेतले होते. बिचारे गांवकरी ! त्यांनीं वाघांची चांगलीच हाय घेतली होती. वाघाच्या भयानें गांववाले घराबाहेर पडण्याचें टाळीत असत.

संध्याकाळ झाली कीं सारे खेडूत घरादारांना कड्या कुलुपें घालून गुपचूप बसून रहात. कित्येक वेळां मलमूत्र-विधीसाठीं सुध्दां ते लोक चार चार दिवस घराबाहेर पडत नसत. आणि इतकें करूनहि बंद केलेलें दार 'उघडण्याचा' आवाज ते श्वास रोखून, कान टवकारून ऐकत. केवळ वाऱ्याच्या झोतानें जरी दार वाजलें तरी लोकांना वाघाचीच धाड आली असा संशय येई.

क्वचित एखादा जादा धीट माणूस मोठ्या साहसानें, जरूरीच्या कामासाठीं म्हणून घराबाहेर पडत असे खरा; परंतु बहुधा तो दुर्दैवीच ठरत असे. कारण तो केव्हांहि घराकडे परत येत नसे. घराघराच्या आडोशानें लपत छपत येऊन विजेच्या चपळाईनें वाघ त्याच्यावर झडप घालीत असे. एखादें दणकट कावेबाज मांजर जसें उंदराला दांतांत घट्ट पकडून गट्ट करून टाकतें तितक्याच चपळाईनें वाघ त्या माणसाला जबड्यांत धरून जंगलांत निघून जात असे. बंद दाराआडून त्या माणसाच्या आर्त किंकाळ्या ऐकून गांवकऱ्यांचें रक्त गोठून जाई. पुष्कळ वेळां असामान्य धैर्य दाखवून कांहीं खेडूत दारें उघडून वाघाच्या मागावर जात. कंदील, काठ्या, जुने विळे, कोयते, सुरे यासारखीं हाताशीं लागतील तीं शस्त्रें, आयुधें घेऊन गांवकरी जंगलांत शिरत. कांहींजण थाळ्या पिटून, आरडाओरडा करून वाघाला हुसकावण्याचा प्रयत्न करीत. पण—पण

या प्रयत्नांना क्वचितच यश येत असे. आलेंच कदाचित यश तरी त्याचा कांहींहि उपयोग नसे. कारण तोंपर्यंत वाघानें झडप घातलेला दुर्दैवी माणूस भीतीनें वा रक्तस्त्रावानें केव्हांच गतप्राण झालेला असे. लोकांच्या हातीं येत असे तो केवळ त्याचा मृत देहच. अर्थात् तो मुडदा सुध्दां वाघाचा पाठलाग केला तरच हातीं येत असे. एरवीं, दुसरे–तिसरे दिवशीं त्याच्या शोधार्थ बाहेर पडलेल्या त्याच्या नातेवाइकांना आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांना रक्तानें भरलेल्या कपड्यांखेरीज कांहींहि आढळत नसे ! कधीं कधीं तर भुकेलेला वाघ ते कपडेसुध्दां खाऊन टाकी. आणि मग क्वचित कांहीं आढळलेंच तर फक्त मोठालीं हाडेंच. तीं हाडेंसुध्दां गांवकरी गोळा करून मोठ्या प्रेमानें घेऊन जात. त्यांचे चेहरे मात्र निराशेनें भकास झालेले असत.

या भीतीच्या भयाण काळोख्या वातावरणांत कुमावमधील लोक वर्षानुवर्षें रहात होते. वाघानें बळी घेतलेल्या लोकांची संख्या भरमसाट फुगत चालली होती. या खेड्यामध्यें असें एकहि कुटुंब शिल्लक राहिलें नव्हतें कीं, ज्यांतील कोणी ना कोणी नातेवाईक नरभक्षक वाघानें खाल्ला नव्हता.

एकेका नरभक्षक वाघानें खाल्लेल्या माणसांची संख्या येवढी मोठी होती कीं, ती सांगितली तर प्रथमदर्शनीं कोणाचा त्यावर विश्वास देखील बसणार नाहीं.

रुद्रप्रयागच्या एका नरभक्षक सैतानी वाघानें तर १९१८ पासून १९२६ पर्यंत म्हणजे सतत आठ वर्षांच्या काळांत सुमारें एकशेंपंचवीस माणसांचे बळी घेतले होते ! हा भयंकर वाघ हजारों मैलांच्या टा ूत हिंडत होता आणि क्रूरपणें माणसें मारीत होता.

एवढा सारा भयानक इतिहास वाचल्यानंतर वाचकांच्या मनांत सहजच एक शंका उत्पन्न झाली तर नवल नाहीं.—एवढा भयंकर प्रलय चालू असतांना त्या वेळच्या ब्रिटिश सरकारनें त्यावर कांहीं उपाययोजना कशी केली नाहीं ?—सरकारी अधिकारी त्या वेळीं काय करीत होते ? का एतद्देशीय लोकांच्या प्राणांबद्दल, बकऱ्यामेंढ्यांच्या प्राणाइतकीच त्यांना पर्वा वाटत होती ?—जरा कुठें राजसत्तेविरुद्ध खुट् व्हावयाचा अवकाश !—साधें भाषण, साधा 'वंदेमातरम्' शब्द देखील गांवच्या गांव बेचिराख करण्याला पुरेसा होता.—मग या नरभक्षक वाघांचा बंदोबस्त करणें तत्कालीन उत्तर प्रदेशीय सरकारला शक्य नव्हतें का ?— कीं जाणून बुजून तिकडे दुर्लक्ष केलें जात होतें ?

आणि याशिवाय ज्या भागांत या नरभक्षक वाघांनीं प्रलय माजविला होता, तेथील गढवाली लोकांचा सैन्यांत भरणा होता. ते गढवाली लोक खात्रीनेंच शूर होते. मग, असें कां घडत होतें ? याला उत्तर एकच नि तें म्हणजे— त्या लोकांची शक्ति या कामीं अपुरी पडत होती.

या घटनेविषयीं सरकारहि पूर्ण जागृत होतें. रुद्रप्रयागच्या या रुद्रावताराला कंठस्नान घालण्यासाठीं सरकारनें दहा हजार रुपयांचें इनाम जाहीर केलें होतें. गांवोगांवच्या उत्तम नामवंत शिकाऱ्यांची यासाठीं पगारी नेमणूक त्या ठिकाणीं झाली होती. केवळ याच वाघाच्या शिकारीसाठीं बंदुकांचे जवळ जवळ तीनशें स्वतंत्र परवाने दिले गेले होते. गढवाल रेजिमेंटमधल्या सैनिकांना रजेवर जातांना बंदूक बरोबर नेण्याची खास परवानगी होती. हिंदुस्थानांतील सर्व वृत्तपत्रांतून वाघ मारण्यासाठीं शिकाऱ्यांना निमंत्रण करणारा मजकूर छापला जात होता. त्या संकटग्रस्त खेड्यांतून वाघाचे सांपळे बसविण्यांत आले होते. गांवकामगारांनीं या नरभक्षक वाघासंबंधीं इत्थंभूत माहिती कळविण्यासंबंधीं सरकारी हुकूम सुटले होते. पण इतकें करूनहि, हजारों मैलांच्या टापूंत मोकाटपणें थैमान घालणाऱ्या सैतानाचा अद्याप निकाल लागलेला नव्हता—हा नरभक्षक वाघ मारला जात नव्हता.

**पैजेचा विडा :**

जणूं साऱ्या मानवजातीला या सैतानानें दिलेलें मूक आव्हानच होतें तें ! पाहूं या कोण दमतें ? कोण जिंकतें ? जणूं ही एक सैतानी पैज होती !

अखेर या पैजेचा विडा एका 'साहेबा' नें उचलला—जणूं त्या दोघांत अटीतटीचा सामनाच सुरूं झाला. त्या निधड्या छातीच्या 'साहेबा'चें नांव होतें जिम् कॉर्बेट !

एखाद्या अदृश्य भुताप्रमाणें आज या खेड्यांत तर उद्यां त्या खेड्यांत, याप्रमाणें सुमारें नव्वद खेड्यांतून या जंगलच्या राजाचा स्वैर संचार चाललेला होता. हा निधड्या छातीचा शिकारी त्याच्यामागून कित्येक आठवडे हिंडला. त्या वाघानें मारलेल्या माणसाच्या प्रेताशीं, पुलावर, रस्त्यावर बसून त्यानें अनेक रात्री जागविल्या.

अलकनंदा नदीच्या पुलावर असलेल्या टॉवरवर जिम् लागोपाठ वीस रात्री बसला ! या टॉवरची उंची साठ फूट होती. या उंच टॉवरवरून वारा इतक्या जोरानें घोंगावे कीं, माणूस उडून कोसळून खालीं नदीच्या प्रवाहांतच पडावा. साठ फुटांवरून अलकनंदेच्या प्रवाहांत कोसळण्याची भीति वीस रात्रीं कॉर्बेटच्या मनांतून गेली नव्हती. रात्रीं निश्चलपणें बसल्यावर जिम्ला अनेकदां अंगावर चढलेल्या मुंग्यांचाहि त्रास होई. या भयंकर मुंग्या कॉर्बेटच्या कातडीचें मांस तोडून अक्षरशः जाळें बनवीत. पण अशाहि स्थितींत कॉर्बेटनें वीस रात्री त्या मोकळ्या टॉवरवर काढल्या. आणि गंमत अशी कीं, एवढ्या वीस दिवसांत अलकनंदेच्या पुलावरून एका फडतूस कोल्ह्याखेरीज कसलेंहि जनावर जातांना त्याला दिसलें नाहीं !

दहा आठवडे हा असा आट्यापाट्यांचा खेळ चाललेला होता. त्या सैतानाला मारण्याचा कॉर्बेट अतोनात प्रयत्न करीत होता तर हा सैतानी वाघ साहेबाच्या नरडीचा घोट घेण्यासाठीं जिभल्या चाटीत हिंडत होता.

–एक विलक्षण धैर्यवान माणूस आणि एक विलक्षण हुषार श्वापद यांच्यामधील ही फ्रीस्टाइलची लढत अनेक डावपेंचांनंतर एकदांची संपली. जिम् कॉर्बेटनें त्या सैतानी वाघाला गांठलें आणि त्याच्याबरोबर उघड सामना केला. अखेर सात फूट दहा इंच लांबीचा रुद्रप्रयागचा हा नरभक्षक बिब्ळ्या सैतान कॉर्बेटनें यमसदनाला पाठविला.

या लढतीचें बहारदार वर्णन कॉर्बेटनें स्वतःच लिहिलेल्या "मॅनईटर लेपर्ड ऑफ रुद्रप्रयाग" या पुस्तकांतून वाचणेंच अधिक चांगलें.

जिम् कॉर्बेटनें नरभक्षक वाघाचा नायनाट केल्याचें वृत्त जेव्हां गांवकऱ्यांना समजलें तेव्हां त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. आसपासच्या अनेक खेडयांतील गांवकरी, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं, जिम्चें अभिनंदन करण्यासाठीं रुद्रप्रयागच्या डाक बंगल्यासमोर गोळा झाले. 'साहेबाला' भेटण्यासाठीं रिक्त हस्तानें कसें जावें ? म्हणून लोकांनीं ओंजळींत फुलें आणलीं होतीं. लोक तीं त्याला अर्पण करीत. आणि त्यांतला कोणी म्हणे "साहेब, या सैतानानें माझा मुलगा मारला आणि माझ्या वंशाला दिवा उरला नाहीं."

दुसरा सांगे, "साहेब, माझ्या पांच लेकरांची आई यानें ओढून नेली; आतां घरांत बाईमाणूस नाहीं."

....दुःखामागून दुःखें सांगितलीं जात होतीं; आणि त्याबरोबरच साहेबापुढें फुलांचा खच पडत होता.

## 'शिकारी' म्हणूनच जन्मला :

.आठ वर्षें प्रयत्न करून जें इतरांना शक्य झालें नव्हतें तें जिम् कॉर्बेटला कसें शक्य झालें ? अर्थात, सखोल ज्ञान, जंगलचा अभ्यास–केवळ अभ्यासामुळें इतरांना मुळींच न समजलेल्या कित्येक गोष्टी त्याला समजल्या होत्या.

ओरडण्यावरून वाघ कोणीकडे आहे हें जिम्ला निश्चितपणें समजत असे. डोळ्याला कांहींहि न दिसतां केवळ जंगलांतील रानपांखरांच्या बोलण्यावरून त्याला वाघाची प्रत्येक हालचाल समजत असे. वाघाचें नुसतें जमिनीवर धुळींत उमटलेलें पाऊल बघून हा वाघ आहे कीं वाघीण आहे ? किती वयाची आहे ? प्रकृतीनें धडधाकट आहे कीं अधू आहे ? हें तो ओळखूं शके. रात्रीं घरांत पडल्या पडल्या ऐकलेला जंगलांत ओरडणाऱ्या वाघिणीचा आवाज दुःखी वाटला म्हणून जिम् सकाळीं उठून त्या दुःखाचें कारण शोधण्यासाठीं जंगलांत जात असे. आणि या सर्वांवर कडी म्हणजे हा विलक्षण माणूस, नर असला तर मादीसारखें ओरडून आणि मादी असेल तर नरासारख्या हांका मारून त्यांना दहा पंधरा यार्डांवर बोलावीत असे ! शोधून दृष्टीस पडेनात म्हणून अशा हांका मारून त्यानें अनेक वाघ मारलेले आहेत.

कॉर्बेटचें हें ज्ञान वाघांपुरतेंच मर्यादित नव्हतें तर, केवळ धुळीवर उमटलेल्या सरपटीवरून तो सर्प विषारी

आहे कीं बिनविषारी आहे, हें तो ओळखीत असे. खुरांच्या खुणा बघून चितळांचा कळप संख्येनें केवढा आहे, तें त्याला अचूक समजत असे. झाडाच्या फांदीवर उडून येणाऱ्या कावळ्यांच्या चोंच घासण्याच्या पद्धतीवरून वाघानें मारलेलें जनावर कुठें आहे हें त्याला उमगत असे.

जिम् मोठा समयसूचकहि होता. एकदां एक वाघ जिम्च्या अगदीं आसपास असतांना जिम्ला खोकला आला. जिम्-जवळ त्यावेळीं कसलेंच हत्यार नव्हतें. प्रसंग मोठा कसोटीचा होता. जिम् मोठ्या धीराचा खरा ! त्यानें लगेच "खॉक" "खॉक" असा माकडासारखा आवाज काढला आणि वाघाला हुलकावणी दिली.

शरिरानें सडपातळ आणि भरपूर उंच असलेल्या कॉर्बेटला डोंगरकड्यावर आत्मविश्वासानें झपाझप चढतां येत असे. फार काय पण रानांतून वाघाप्रमाणें पावलांचा आवाज मुळींच न करतां तो चालत असे. वानरासारखा तो रात्रीं झाडावर झोप घेत असे. आणि भूक मारून तीन तीन दिवस हिंडण्याइतका चिवटपणाहि त्याच्यापाशीं होता. याहिपेक्षां आश्चर्याची गोष्ट म्हणजे संकटाची आगाऊ जाणीव देणारी 'सहावी संज्ञा' परमेश्वरानें त्याला दिलेली होती. जंगलांत फिरतांना, मध्येंच अचानकपणें त्याला जाणीव होई कीं वाघ आपल्या मागेंच आहे—अन् तो तसा असेहि ! या जाणिवेमुळेंच अनेकदां

अनेक वाघांनीं मनावर घेऊनहि जिमला ऐंशीं वर्षांचें आयुष्य लाभलें. विश्वकर्म्यानें जन्माला घालतांनाच या माणसाला 'शिकारी' म्हणूनच जन्माला घातलें असावें. एरवीं शिकाऱ्याचे एवढे गुण एका माणसापाशीं कसे असतील ?

**रोमांचकारी इतिहास :**

अशा या अष्टपैलू शिकाऱ्याबद्दल तिकडील लोकांना भारी प्रेम होतें. जिम्‌वर त्यांचा मोठा विश्वास होता. जिम्‌चा त्यांना मोठा आधार वाटे. इतर सर्वांचे प्रयत्न फसले कीं गांवचा पाटील जिम्‌ला 'कागद' पाठवीत असे, "साहेब, आतां तुमच्यावांचून आमची सोडवणूक होणार नाहीं. हा वाघ मारला नाहीं तर आम्हांला घराबाहेर पडतां येणार नाहीं. आणि घराबाहेर पडलों नाहीं तर आमचीं शेतें कापलीं जाणार नाहींत. पिकेंच जर हातीं आलीं नाहींत तर आम्हीं खावें काय ? जगावें कसें ?–" अशा तऱ्हेच्या मजकुराखालीं गांव-पाटलाचा शिक्का आणि पन्नास लोकांच्या स्वाक्षऱ्या असत, कांहीं निशाणी-अंगठेहि असत.

असें पत्र आलें कीं कामधंदा सोडून कॉर्बेट बंदूक उचली आणि डोंगरा-जंगलांतून वीस वीस मैल पायीं चालून त्या गांवीं येऊन उभा राही. या मोहिमेंत काळजाचें

पाणी करणारीं अनेक दृश्यें जिम्‌ला दिसत. वाघानें फाडलेल्या- स्त्री-पुरुषांच्या जखमा जिम्‌ला आपल्याजवळच्या औषधानें अनेकदां धुवाव्या लागत. स्वच्छ असें कापड बँडेजसाठीं न मिळाल्यामुळें जिम् कित्येकदां आपले स्वत:चे कपडेहि त्यासाठीं फाडीत असे. आणि इतकें करूनहि चिघळलेल्या जखमांमुळें त्या दुर्दैवी लोकांचा मृत्यूहि त्याला उघड्या डोळ्यांनीं वेळोवेळीं पहावा लागे.

शिकारींत आलेले अनेक रोमांचकारी अनुभव जिम्‌नें "मॅनईटर्स ऑफ् कुमाव" या आपल्या ग्रंथांत लिहिले आहेत. ते वाचतां वाचतां श्वास रोखून धरावा लागतो ! वाचणाराच्या डोक्यावरचे केंस उभे रहातात ! काळजाचा एकाद दुसरा ठोका चुकतो....या हकीगती इतक्या विलक्षण आहेत कीं पुष्कळांचा त्यांवर विश्वास देखील बसणार नाहीं. सामान्य वाचकांना तर शंका येईलच पण, वाघाची शिकार ज्यांनीं केली आहे अशांना तर तशी शंका जबरदस्त येईल. कॉर्बेटला याची जाणीव अलिकडे झाली असावी असें दिसतें. कारण नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या "टेंपल टायगर अँड मोअर मॅनईटर्स ऑफ कुमाव" या त्याच्या पुस्तकांत त्यानें तसें म्हटलें आहे. आणि मग ही शंका निरसन करण्यासाठीं, पायीं भटकण्याची ज्यांना आवड आहे, हिमालयाचें ज्यांना आकर्षण आहे अशा विद्यार्थ्यांना, शिकाऱ्यांना, सैन्यांतील जवानांना त्यानें एक मार्ग दिला

आहे. तनकपूरपासून वरमदेव, वरमदेव ते पूर्णगिरी आणि पूर्णगिरी ते थाक आणि थाक ते चुका असा हा मार्ग तालाकोटजवळ थांबतो.

कॉर्बेट म्हणतो, "थाक खेड्यामध्यें तुम्हांला एक तिबेटी भेटेल. हा पाटलाचा नातलग आहे आणि चांगला उमदा ब्राह्मण आहे. तो वाघानें खाल्लेल्या आपल्या मृत भावाचा देह कुठें सापडला ती जागा तुम्हांला दाखवील... चुका खेड्यामध्यें कुंवरसिंह भेटेल आणि तो मी दोन वाघिणी कशा मारल्या तें तुम्हांला सांगेल.... नंतर चुकापासून तालाकोट. हा जरा लांबचा प्रवास आहे. तेव्हां तुम्ही भल्या पहांटे चालायला लागा. नंतर तुम्ही सेम खेड्यांत याल. सेमचा पाटील मी पाहिला तेव्हां कोवळा पोर होता. तो तुम्हांला रानांत नेईल आणि आपली आई गवत कापत असतांना वाघानें कुठून नेली ती जागा दाखवील....तालाकोटचा डोंगरसिंह मालगुजार आतां चोवीस वर्षांचा झाला असेल. त्याला माझा सलाम सांगा. तो तुम्हांला रानांत घेऊन जाईल. त्याच्या आईला वाघानें ज्या ओकवृक्षाखालीं नेऊन खाल्लें, तें झाड तो तुम्हांस दाखवील. नंतर डावीकडे वळा. थोडेंसें चाला. पश्चिमेकडे असलेल्या दरीकडे तोंड करा. आतां डोंगरसिंह तुम्हांला जिथें वाघानें सहा बकरीं खाल्लीं ती जागा दाखवील. इथेंच मी त्या नरभक्षक वाघावर गोळी घातली. ही

वाघीण मी मारली. त्याला अनेक लोक साक्षीदार होते. त्यांपैकीं आतां पुष्कळ जण मरून गेले असतील. पण जे अद्याप हयात असतील त्यांच्या स्मरणांतून ही शिकार खचित गेली नसेल...

आपल्या वाचकांचा विश्वास बसावा म्हणूनच त्यानें त्या खेडयांना आणि त्या व्यक्तींना भेटी देण्याविषयीं या पुस्तकांत सुचविलें आहे.

## शिकारीचें 'कॉर्बेट'-तंत्र :

नरभक्षक वाघाच्या मागावर जिम् नेहमीं अगदीं एकटा—अन् तोहि रात्रीं अपरात्रींसुद्धां जाई. एकटयानें जाण्याचें कारण देतांना जिम् म्हणतो कीं, "सोबती बरोबर असल्यावर आपण थोडेसे ढिले रहातों. दुसरें म्हणजे दोन-चार जणांचा जीव सांभाळण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडते." एकटयाचेंच जें काय व्हायचें तें होईल अशीच जिम्ची वृत्ति असे. अर्थात स्वत:चें संरक्षण करायला जिम् पूर्ण समर्थ होता. जिम्चें नशीबहि असें शिकंदर कीं तो अखेरपर्यंत हातापायांनिशीं धडधाकट राहिला. कांहीं प्रसंग तर त्याच्यावर असे आले, कीं आत्तां मरतों कीं मग मरतों असें त्याला वाटलें होतें. खर्चामुळें किंवा थंडीवाऱ्यांतून हिंडून आलेल्या तापामुळेंहि तो टेकीस येई. पण अशा प्रत्येक प्रसंगीं आपल्यामुळें

एखाद्याचा कां होईना पण जीव बचावला याचें जिम्‌ला फार मोठें समाधान वाटे.

जंगलांत शिरल्यावर जिम् चौफेर नजर ठेवून, कानांत जीव आणून फुटाफुटानें प्रगती करीत रान चाळीत असे. पण हुषार जनावर त्याला हुलकावणी देई. आपली कुणा जनावराशीं गांठ आहे हें जसें जिम्‌ला माहीत असे. तसें हा साहेबहि नेहमींपेक्षां कोणी वेगळा आहे हें वाघहि जाणून असे. अशा वेळीं कॉर्बेट दमून भागून परत तळावर येई, आणि पुढचे डाव कसे टाकावेत याचा विचार करीत तो झोपीं जाई. सकाळीं जेव्हां तो पुन्हां बाहेर पडत असे तेव्हां कधीं कधीं आदल्या रात्रीं परत येतांना उठलेल्या त्याच्या पावलांत वाघाचीं पावलेंहि उमटलेलीं असत-म्हणजे रात्रीं परत येतांना वाघ त्याच्या मागें होताच ! मग त्यानें जिम्‌वर उडी घेऊन त्याला धरलें कां नाहीं ? जिम् जिवंत माघारीं कसा आला ?—हें सारें खुलाशा-पलिकडचें आहे !

## दोन विलक्षण हकिगती :

शिकार-मोहिमेवर गेला म्हणजे कॉर्बेट खेडुतांना माहिती विचारीत असे. लोकहि ती सांगत. एका वाघा-संबंधीं दोन हकिगती मोठ्या चित्तथरारक आहेत. लोकांच्या शब्दांतच त्या सांगितलेल्या बऱ्या.

" साहेब, दोन महिन्यांपूर्वी आम्ही पंचवीस जणं चंपावनच्या बाजाराला निघालों होतों. इतक्यांत एकाएकीं आम्हांला किंकाळ्या ऐकूं आल्या. त्या आरोळ्या खालीं असलेल्या दरींतून येत आहेत हें आम्हांला समजलं. हलके हलके किंचाळणं जवळून ऐकूं येऊं लागलं अन् पुढच्याच क्षणाला आम्हांला एक विचित्र दृश्य दिसलं. एका विवस्त्र स्त्रीला तोंडांत धरून वाघाची स्वारी निघालेली होती ! कांहीं वेळानं वाघानं तिला आपल्या पाठीशीं धरलं. एका बाजूला त्या बाईचे केस लोळत होते आणि दुसऱ्या बाजूला पाय फरफटत होते. आणि ती बाई मोठमोठ्यानं किंकाळ्या फोडून कधीं देवाचा धांवा करीत होती तर कधीं माणसांना हांका मारीत होती "

ही दुर्दैवी स्त्री जळण गोळा करायला जंगलांत गेली होती आणि तिथेंच वाघानें तिच्यावर झडप घातली होती. गांवकऱ्यांना तिचे कपडे आढळले आणि त्यांनीं थाळ्या पिटून आरडाओरडा केला. कांहीं वेळानें ती स्त्री एका शिळेवर मृत स्थितींत पडलेली लोकांना आढळली. वाघानें फक्त तिच्या नरडीचा घोट घेतला होता......

याच वाघानें लागोपाठ आणखी एक बळी घेतला होता....दोन बहिणी टेकडीवर गवत कापीत असतांना

वाघ आकस्मिकपणें मागून आला आणि मोठ्या बहिणीला तोंडांत धरून तो पळत सुटला. लहान बहिणीनें आरडा-ओरडा करून माणसें जमवलीं, पण त्याचा कांहींहि उप-योग न होतां लोकांना मोठ्या बहिणीचा मुडदाच घरीं आणावा लागला.—तें दृश्य बघतांच लहान बहिणीची वाचाच गेली !...कॉर्बेटनें जेव्हां या मुलीची भेट घेतली आणि "तुझ्या बहिणीला नेणाऱ्या वाघाला मारण्यासाठीं मी आलों आहें," असें सांगितलें, तेव्हां आपले करुण डोळे खालीं वळवून तिनें कॉर्बेटच्या पायाला हातानें स्पर्श केला.—कॉर्बेटला मोठें शरमल्यासारखें झालें. आपण या अश्राप जिवाला फसवीत आहोंत असें त्याला वाटलें; कारण हा नरभक्षक वाघ एका ठिकाणीं दोनदां दिसत नसे. त्याचा संचार अनेक मैलांच्या टापूंत असे. अशा परिस्थितींत हा आपल्या हातीं कसा लागणार ?—पण, पण हाहि वाघ कॉर्बेटनें मारलाच. त्याचें कातडें नेऊन त्यानें त्या दुर्दैवी मुलीपुढें पसरलें त्याबरोबर तिला वाचा फुटली. कित्येक दिवस तोंडांतून शब्दहि न काढलेली ती तरुणी इकडे तिकडे धांवत सुटली आणि गांवकऱ्यांना हांका मारून म्हणूं लागली, "बघा—बघा—साहेबांनीं सैतान मारला...."

कुमावच्या लोकांना जिम्‌बद्दल कमालीचा आदर वाटत असे. हा गोरा साहेब म्हणजे देवच आहे असें त्या

खेडुतांना वाटे. कारण त्याखेरीज तो इतका निर्भयपणें जंगलांतून कसा फिरला असता ?

बहाद्दर शिकारी :

भारताचे पूर्वींचे एक व्हाइसरॉय लॉर्ड लिन्लिथगो यांनीं सुद्धां जिम् कॉर्बेटबद्दल मोठे प्रशंसेचे उद्गार काढले आहेत. "मॅनईटर्स ऑफ कुमाव" या जिम् कार्बेटलिखित ग्रंथाच्या प्रस्तावनेंत लॉर्ड लिन्लिथगो म्हणतात, "जिम् कार्बेटबरोबर मीं शिकार केलेली आहे. यापूर्वी मीं अनेक खंडांत शिकारी केलेल्या आहेत, पण जिम् कॉर्बेटइतका जंगलचा माहितगार माझ्या पाहण्यांत नाहीं. त्यानें कुमावमधील नरभक्षक वाघांच्या शिकारी करून तेथील रहिवाश्यांना तर सुख प्राप्त करून दिलेंच आहे; परंतु या बहाद्दर शिकाऱ्यानें भारत सरकारचीहि उत्तम प्रकारें सेवा केलेली आहे. नाहींतर इतकीं माणसें बळी पडत असतांना सरकार काय करीत आहे या प्रश्नाला आमच्या-जवळ उत्तर नव्हतें..."

नरभक्षक वाघांच्या शिकारी जिम् कॉर्बेट जवळ जवळ बत्तीस वर्षें करीत होता. नरभक्षक वाघांच्या वृत्तीबद्दल त्यानें छाननी केली आहे ती लक्षांत रहाण्यासारखी आहे. तो म्हणतो कीं, "हीं जानवरें निसर्गतःच नरभक्षक नसतात. तशाच कांहीं कारणांनीं तीं नरभक्षक बनतात. उदाहरणार्थ हा जंगलचा राजा एखाद्या अडाणी शिकाऱ्याकडून

जखमी होऊन निसटतो, किंवा सायाळावर तोंड टाकल्यानें त्याचे नऊ नऊ इंच कांटे अंगांत घुसून अधु होतो. आणि मग जंगलांतील रानटी पशू मारण्याचें सामर्थ्य त्याच्यांत रहात नाहीं. अशा वेळीं प्रतिकाराचें कोणतेंहि साधन जवळ नसलेला दोन पायांचा प्राणी माणूस हाच त्याचें भक्ष्य बनतो. आणि एकदां का त्याला माणसाच्या रक्ताची चटक लागली कीं मग हा पशू घडाधड माणसेंच मारून खाऊं लागतो.... क्वचित म्हातारा झालेला वाघहि नरभक्षक बनतो; कारण रानावनांत हिंडून शिकार साधण्याचें सामर्थ्य त्याच्यांत राहिलेलें नसतें...... कित्येकदां रोगांच्या साथीमुळें अनेक प्रेतें बेवारशी अवस्थेंत तशींच पडून राहतात आणि वाघांना ती आयतींच भक्ष्य म्हणून मिळतात. वाघ तीं प्रेतें फाडून खातो आणि त्याला जन्मतः माणसाचें मांस खाण्याची नसलेली संवय जडते ती कायमचीच. पुढें रोगाची साथ बंद झाल्यावर वाघाला प्रेतें मिळेनाशीं होतात. अर्थात रानावनांत हिंडणाऱ्या माणसावर झडप घालून हे नरभक्षक वाघ आपली भूक भागवितात. मग हें सत्र अखंडपणें चालूं रहातें तें कुणीतरी चांगला शिकारी येऊन त्यांची शिकार होईपर्यंत !"

त्या काळांत जिम् कॉर्बेट हाच सर्वांत चांगला शिकारी होऊन गेला. नरभक्षक वाघांचा जणुं तो कर्दनकाळच !

धाडसाचा केवळ मूर्तिमंत पुतळाच. कॉर्बेटनें अमाप कीर्ति आणि असामान्य लोकप्रियता मिळविली, ती एक अत्यंत कुशल आणि तितकाच सहृदय शिकारी म्हणून.

भारतांतोल वाघाबद्दल लिहितांना कॉर्बेटनें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "A tiger is a large hearted gentleman with boundless courage." —यांत किंचितहि फरक न करतां कॉर्बेटबद्दलहि असेंच म्हणतां येईल. हा साहेबसुद्धां आभाळाएवढ्या मनाचा आणि अमर्याद हिंमतीचा गडी होता. तो आतां 'होता' असेंच म्हणणें भाग आहे. कारण वाघाच्या शिकारीबद्दल जगप्रसिद्ध असलेला जिम् कॉर्बेट २० एप्रिल १९५५ या दिवशीं आफ्रिकेंत नैरोबीजवळ हृदयविकारानें ख्रिस्त-वासी झाला.

—जन्माला आलेली व्यक्ति कधींना कधीं जातेच; पण तिची कीर्ति मात्र कायम रहाते. जिम् कॉर्बेटची कीर्ति कुमावच्या जंगलांत अजूनहि दुमदुमत आहे—"जिम् कॉर्बेट—बहादूर शिकारी."

* * *

१२५१ दि० २०।५।६१
बा. वा.
BVBK-0401251
BVBK-0401251

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्गुणी बनण्याची कला : फ्रॅंकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा डयुमाँ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिकले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटू : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

वोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.